Maharashtra Times, Pune, July 10, 2012. Pp.6

# भारताचे 'चलो मंगळ'

## ■ पुढील वर्षी मोहीम प्रत्यक्षात येण्याची शक्यता

वृत्तसंस्था ■ म्हैसूर
matapune@indiatimes.com

वर्षानुवर्षे केवळ जन्मकुंडलीतल्या मंगळावरच चर्चा करणारे भारतीय आता लवकरच प्रत्यक्ष मंगळ ग्रहावरील परिस्थितीबाबतही अधिकारवाणीने बोलू शकणार आहेत. भारताची महत्त्वाकांक्षी मंगळ मोहीम पुढील वर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रत्यक्षात येण्याची अपेक्षा आहे. त्याबाबत प्रचंड अभ्यास करण्यात आला असून या मोहिमेची मान्यता अंतिम टप्प्यात आली आहे. अवकाश खात्याचे सचिव आणि भारतीय अवकाश संशोधन संघटनेचे (इस्रो) प्रमुख के. राधाकृष्णन यांनी ही माहिती दिली.

लवकरच आपल्या मंगळ मोहिमेबाबतची घोषणा ऐकायला मिळेल, अशी खात्रीही राधाकृष्णन यांनी व्यक्त केली. 'इस्रो'च्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, नियोजित मंगळ मोहिमेबाबत खूप काम पूर्ण झाले असून त्यावर कोणती शास्त्रीय उपकरणे पाठवायची आहेत, याचीही यादी तयार करण्यात आली आहे. तसेच, भारतीय मंगळ मोहिमेबाबतचा (इंडियन मार्स ऑर्बिटर मिशन) प्रकल्प अहवाल सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

पोलार सॅटेलाइट लाँच व्हेइकलच्या



(पीएसएलव्ही -एक्सएल) साह्याने मंगळाभोवती फिरणारा उपग्रह पाठवण्याची योजना आहे. शास्त्रीय उपकरणे घेतलेल्या या उपग्रहाचे वजन सुमारे २५ किलो असेल आणि मंगळाभोवती तो ५०० गुणिले ८०,००० किलोमीटर कक्षेत फिरेल. मंगळावरील जीवन, हवामान, जमीन, उत्पत्ती, उत्क्रांती आणि तेथे जीवनाची काही शाश्वती आहे का, याबाबत अभ्यास करण्याचे प्राथमिक उद्दिष्ट या मोहिमेत ठेवण्यात आल्याचे 'इस्रो'चे म्हणणे आहे.

उपग्रहावर कोणकोणती शास्त्रीय उपकरणे पाठवायची, याची निवडयादी 'इस्रो'च्या अवकाशशास्त्र सल्लागार समितीने तयार केली आहे. तसेच, उपग्रहाबाबतची तांत्रिक वैशिष्ट्येही निश्चित करण्यात आल्याचे 'इस्रो'कडून सांगण्यात आले.